# University of Mumbai

अति महत्वाचे

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२

Email : supt.statunit@gmail.com

शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी
(सांख्यिकी कक्ष)

खोली क्र. २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

**No. AAQA/ICD/2023-24/ 1029 of 2023**

**विषय : अनोळखी मोबाईल नंबरद्वारे AISHE Code साठी पैशांची मागणी करण्यासाठी येणा–या Fake Call बाबत.**

**संदर्भ : मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.उशिसं/सांख्यिकी/AISHE/२०२३-२४/, दिनांक ०५/०९/२०२३ रोजीचे पत्र.**

---

**परिपत्रक :-**

उपरोक्त विषयाबाबतचे व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक तसेच समन्वयक, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय, अंबाडवे, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी व विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदूर्ग, यांचे लक्ष उपरोक्त नमुद विषयाबाबतचे मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन, पुणे, यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्राकडे वेधण्यात येत आहे. (प्रत संलग्न)

सदर पत्रान्वये माननीय संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांनी या संदर्भात खालीप्रमाणे कळविले आहे :-

> " उच्च शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्यामार्फत सर्व संलग्नित महाविद्यालये यांची माहिती संकलित करण्यातकरीता AISHE हे ऑनलाईन वेबपोर्टल विकसित केलेले आहे. तसेच नवीन महाविद्यालयांना AISHE Code प्राप्त करण्याकरीता पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. **सदरची नोंदणी प्रक्रीया ही पुर्णतः विनाःशुल्क असून सदर प्रकीयेचे तीन टप्पे आहेत,** १. विद्यापीठ ऑनलाईन मान्यता, २. राज्य नोडल अधिकारी मान्यता, ३. उच्चतर शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय यांची अंतिम ऑनलाईन मान्यता. सबब तीनही टप्पे मान्य झाल्यास ईमेल आयडीवर AISHE Code पाठविण्यात येतो किंवा प्रक्रीयेत काही त्रुटी असल्यास ती नाकारण्यात येते. सदर नाकारण्यात आलेली प्रक्रीयेचे कारण महाविद्यालयास ईमेलद्वारे किंवा वेबपोर्टलवर Track your Request id या

# University of Mumbai



लिंकवर पाहता येते. या तिनही प्रक्रीयेत महाविद्यालयांकडून कोणत्याही प्रकारचे फी, टॅक्स, शुल्क आकारण्यात येत नाही. परंतु महाविद्यालयांना अनोळखी मोबाईलद्वारे संपर्क करून **AISHE Code** साठी **Google Pay / Phone Pay** व अन्य ऑनलाईन व्यवहारांद्वारे पैशांची मागणी करण्यात येत आहे व पैसे दिल्यावरच **AISHE Code** दिला जाईल असे सांगण्यात येते. सदर नोंदणी प्रक्रीया विनाःशुल्क असून महाविद्यालयांनी अशा कोणत्याही प्रकारच्या फसवणूकीस बळी पडू नये"

तरी सर्व संबंधित प्राचार्य/संचालक व नोडल अधिकारी यांनी याबाबत नोंद घ्यावी.

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १९ ऑक्टोबर, २०२३

(डॉ. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

---

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना :-

उपकुलसचिव, महाविद्यालये संलग्नता व विकास विभाग यांना कळविण्यात येते की, नवीन महाविद्यालयांना संलग्निकरण पत्र (**Affiliation Letter**) देतेवेळी विद्यापीठ स्तरावरून याबाबत कळविण्यात यावे.

(डॉ. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

stat.dhepune@nic.in

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
मध्यवर्ती इमारत, पुणे - 411 001
संकेतस्थळ:- www.dhepune.gov.in

020-29707093

क्र.उशिसं/सांख्यिकी/ AISHE/2023-24/ दिनांक — 05.09.2023

प्रति,
1.कुलसचिव,
सर्व विद्यापीठ,
2.AISHE नोडल अधिकारी,सर्व विद्यापीठे

**विषय :- अनोळखी मोबाईल नंबरव्दारे AISHE Code साठी पैशांची मागणी करण्यासाठी येणाऱ्या Fake Call बाबत.**

उपरोक्त विषयान्वये अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम, उच्चतर शिक्षा विभाग,शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत राबविण्यात येतो. तसेच नवीन महाविदयालयांना AISHE या पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे.

त्या अनुषंगाने नवीन महाविदयालय AISHE या पोर्टलवर नोंदणी करतात, पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महाविदयालयास पाच अंकी Request Id प्राप्त होतो, त्यानंतर प्राप्त झालेल्या Request Id ला प्रथम आपल्या संलग्नित विद्यापीठाची ऑनलाईन (Approval) मान्यता असते, विद्यापीठाने महाविदयालयाने केलेली Online Request व्यवस्थित तपासून मान्य करुन पुढील कार्यवाहीसाठी स्टेट नोडल ऑफिसर (उच्च शिक्षण संचालनालय,पुणे) यांच्याकडे वर्ग करावे. तसेच महाविद्यालयास पुढील प्रक्रियेची माहिती देणे. नोंदणी प्रक्रिया ही पूर्णपणे विनाशुल्क आहे. या प्रक्रियेचे तीन टप्पे आहेत, 1. विद्यापीठाचे ऑनलाईन अप्रूवल 2.राज्य नोडल अधिकारी ऑनलाईन अप्रूवल व अंतिम 3.उच्चतर शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत सदर महाविदयालयास केलेल्या ऑनलाईन विनंतीत दिलेल्या ई-मेल आयडीवर AISHE Code पाठविण्यात येतो किंवा त्रुटीअसल्यास नाकारण्यात येते. सदर महाविदयालयास नाकारण्यात आल्याचे कारणदेखील ई-मेलव्दारे पाठविण्यात येते. तसेच या तिन्ही टप्प्यात महाविदयालये यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे फी, टॅक्स, शुल्क स्वीकारले जात नाही.

परंतु काही महाविद्यालये यांना अनोळखी मोबाईल नंबरव्दारे संपर्क करुन AISHE Code साठी Google Pay / Phone Pay अन्य ऑनलाईन व्यवहारांव्दारे पैशांची मागणी करण्यात येत आहे. व पैसे दिल्यावरच AISHE Code दिला जाईल असे सांगण्यात येत आहे. या प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क नसल्याने, महाविदयालयांनी अशा कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीस बळी पडू नये. अशा सूचना विद्यापीठ नोडल अधिकारी यांनी संलग्निकरण पत्र ( Affiliation Letter ) देतेवेळी आपल्या अंतर्गत असणाऱ्या नवीन महाविदयालयांना विद्यापीठ स्तरावरुन कळविण्यात यावे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 13-10-2023 17:25:49

डॉ.शैलेंद्र देवळाणकर
शिक्षण संचालक ( उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य, पुणे.